# घनकचरा व्यवस्थापनासाठी 'पीपीपी' हाच पर्याय

## डॉ. दिलीप बोराळकर यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी ■ औरंगाबाद
mtabd@indiatimes.com




घनकचरा व्यवस्थापनासाठी पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) हाच पर्याय आहे. पीपीपी शिवाय घनकचऱ्याचा प्रश्न सुटणार नाही असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी सदस्य सचिव डॉ. दिलीप बोराळकर यांनी केले.

कॉनफडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे 'वेस्ट मॅनेजमेंट' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी एक्सपर्ट ग्लोबलचे कॉन्फरन्स चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक प्रशांत देशपांडे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसचिव पी. के. मिराशे, जिल्हाधिकारी कुणालकुमार, कॉनफडरेन ऑफ इंडियन इंडस्ट्रीच्या मराठवाडा विभागाचे अध्यक्ष कुलथो कुमार यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. दिलीप बोराळकर म्हणाले, 'घनकचरा व्यवस्थापनाच्या समस्येसंदर्भात केवळ सूचना करून चालणार नाही. ही समस्या सोडवण्यासाठी ठामपणे काहीतरी मार्ग काढला पाहिजे. ही समस्या सोडवण्यासाठी तंत्रज्ञानाचे बेंचमार्किंग झाले पाहिजे. घनकचऱ्यापासून वीजनिर्मिती औरंगाबादेत शक्य नाही. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप व टेक्नीकल सोल्युशन यातूनच हा प्रश्न सुटेल. यासाठी उद्योगांनी पुढाकार घ्यावा, कारण पुढील काळात मराठवाड्यातच उद्योगांची वाढ होणार आहे, त्यामुळे आपण जर घनचऱ्याच्या समस्येबाबत दुर्लक्ष केले तर त्याचे दूरगामी परिणाम होतील.' जिल्हाधिकारी कुणालकुमार म्हणाले, 'घनकचरा व्यवस्थापनाची सुरुवात आपण आपल्या घरापासून केली पाहीजे. घनकचरा व्यवस्थापनात सहकार्य न करणाऱ्यांना इतका दंड केला असे सांगून शेखी मिरवण्यापेक्षा कचरा कमी कसा तयार होईल याकडे लक्ष दिले तर ते अधिक योग्य होईल.'

कुलथो कुमार यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रशांत देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद
15-6-2012